आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,
पुणे-४११००१

दुरध्वनी- ०२० -२६३६०९४१

E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in

जा.क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा-वि.नि.सु./का- ४/ 3८9४ दिनांक : 9८/99/२०२४

## महत्त्वाची सूचना

**स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२४-२५ अंतर्गत पोलीस व सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता उमेदवारांसाठी संस्था निवडीबाबतची विकल्प लिंक उपलब्ध करून देणेबाबत**

**अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना पोलीस व सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण** कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण देणाऱ्या खाजगी नामांकित प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यासाठी विकल्प देण्याची सुविधा देखील जा. क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का- ४/३६४० दि. ०६/११/२०२४ अन्वये उपलब्ध करून देण्यात आली होती.

उक्त सूचनेच्या आधारे प्राप्त झालेल्या विकल्पांची संख्या विचारात घेता **पोलीस व सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमासंदर्भात परिपूर्ण अर्ज दाखल केलेल्या उर्वरित सर्व उमेदवारांकरिता प्रशिक्षण संस्था निवड विकल्प सादर करण्याची सुविधा उपलब्ध दि. १९/११/२०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेपासून दि. २५/११/२०२४ रोजी रात्री ११.५९ पर्यंत** या कालावधीत उपलब्ध करून देण्यात येत आहे. **ज्या उमेदवारांनी पोलीस व सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता यापूर्वी संस्था निवड विकल्प नोंदविले नाहीत त्यांनाही सदर कालावधीत खाली दिलेल्या लिंक वरून विकल्प भरता येतील.**

**विकल्प सुविधा लिंक:** https://cpetp.trti-maha.in/

विकल्प सादर करताना **जा. क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का- ४/३६४० दि. ०६/११/२०२४ अन्वये निर्गमित केलेल्या सूचना वाचून** उमेदवारांनी विकल्प देण्याची कार्यवाही पूर्ण करावी. तसेच पोलीस व सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम संदर्भात जा. क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा-का.प.सू/का- ४/३६७४ दि. १३/११/२०२४ अन्वये दिलेल्या सूचनाही काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे.

प्रत्येक स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमा अंतर्गत देय असलेले प्रशिक्षण शुल्क व प्रशिक्षणार्थींना देण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाबाबतची सविस्तर माहिती (Stipend and any other payments as applicable) ही यापूर्वीच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर दि. २०/०९/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचना क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का-४/२७५९ अन्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे. उमेदवारांनी सर्व माहिती पडताळून त्यानंतरच आपली योजना व प्रशिक्षण संस्था विकल्प देण्याची कार्यवाही पूर्ण करावी.

पूर्व प्रशिक्षण संस्थेच्या निवडीकरिता ऑनलाइन विकल्प देण्यासाठी संबंधित लिंक वरून लॉगीन करणे आवश्यक आहे. **आपले लॉगीन आयडी व पासवर्ड हे संबंधित उमेदवारांना त्यांनी प्रवेश अर्ज (Application Form) भरताना वापरलेल्या Email ID वर पाठविण्यात येतील. सबब उमेदवारांनी सदर ईमेल व मोबाईल क्रमांक सदरची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू स्थितीत ठेवणे आवश्यक आहे.** ज्या उमेदवारांनी पूर्वी विकल्प दिले नाहीत अशा उमेदवारांनाच आत्ता विकल्प देण्याची सुविधा उपलब्ध राहील.

***प्रशिक्षण संस्थांचे विकल्प देणे ही उमेदवाराची स्वत:ची जबाबदारी आहे. त्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत कोणत्याही प्रकारे उमेदवारांशी संपर्क साधून त्यांचे ईमेल अथवा मोबाईल क्रमांकावरील OTP मागितला जात नाही. उमेदवारांना सतर्क करण्यात येते की अशा प्रकारच्या भूलथापांना बळी पडू नये. उमेदवारांनी आपले SMS / ईमेल OTP कोणासही देऊ नये. अशा प्रकारे कोणाही त्रयस्थ**

**व्यक्तीस/संस्थेस उमेदवारांनी OTP दिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही उमेदवाराची राहील याची काळजीपूर्वक नोंद घ्यावी.***

**सदर प्रमाणे प्राप्त झालेले पसंतीक्रम/विकल्प हे अंतिम असून त्यात कोणताही बदल करता येणार नाही**, सबब उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी योजनेची निवड अत्यंत काळजीपूर्वक करावी तसेच प्रशिक्षण संस्थांचे विकल्प हे त्यांच्या संदर्भातील उपलब्ध माहिती View Details Tab मधून वाचून तसेच आवश्यक असल्यास संबंधित संस्थेशी संपर्क करून भरावे.

सदर विकल्प लिंक वर Contact Us या Tab/शीर्षकाखाली सर्व संबधित योजनांचे **योजनानिहाय संपर्क Email ID दिले** आहेत. **तसेच विकल्प लिंक वर लॉगीन केल्यानंतर Support या Tab/शीर्षकाखाली Raise A Ticket या सुविधेद्वारे आपली समस्या नोंदविण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.** सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी केवळ याच मार्गाने आपल्या समस्या नोंदवाव्या. इतर कोणत्याही Email तसेच संपर्क क्रमांकावर आपल्या तक्रारी अथवा समस्येची नोंद घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. त्याचबरोबर काही अपरिहार्य कारणास्तव उमेदवारांचा Mobile Number बदलणे आवश्यक असल्यास तशी सोय त्यांच्या स्वतःच्या login केल्यानंतर दिसणाऱ्या Profile Section मध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**अत्यंत महत्वाचे:**

१. **विकल्प सादर करण्याची संधी ही कोणत्याही प्रकारे आपला संबंधित योजनेकरिता प्रवेश निश्चित झाल्याची खात्री देत नाही याची नोंद घ्यावी. योजनानिहाय मंजूर लाभार्थी संख्या, संबंधित खाजगी नामनिर्देशित प्रशिक्षण संस्थांमधील उपलब्ध प्रशिक्षणार्थी क्षमता, उमेदवारांचा पसंतीक्रम व उमेदवारांचा गुणानुक्रम या सर्व बाबींना अनुसरूनच प्रशिक्षण संस्थांमध्ये संबंधित उमेदवारास प्रवेश दिला जाईल.**

२. **ज्या संस्थेमध्ये आपली कागदपत्र पडताळणी होईल त्याच संस्थेत आपला प्रवेश निश्चित झाला आहे असे ग्राह्य धरू नये**. प्रत्यक्ष प्रशिक्षण घेण्यासाठीची संस्था ही वरील मुद्द्यात वर्णन केल्याप्रमाणे कागदपत्र पडताळणी अंती निश्चित होईल व त्याबाबत आपणास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३. तसेच दि. २०/०९/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचना क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का-४/२७५९ नुसार पोलीस व सैन्य पूर्व प्रशिक्षण संदर्भात शारीरिक अर्हता तसेच कागदपत्र पडताळणी अंती उमेदवारांचा प्रवेश अंतिम करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

४. पडताळणीच्या आणि/किंवा योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार हा दुबार लाभ घेत असल्याचे आढळून आल्यास त्याचा प्रवेश तात्काळ रद्द करण्यात येईल याचीही सर्वांनी नोंद घ्यावी.

(**डॉ. राजेंद्र भारुड,** भा. प्र. से.)
**आयुक्त**
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे